# डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे पुस्तकांचे जतन व्हावे : मंदार जोगळेकर

**पुणे, ता. १५ :** ''तंत्रज्ञानात बदल झाले तरीही नवे पुस्तक हाताळण्याचा आनंद, त्याला येणारा विशिष्ट प्रकारचा सुगंध हा अनुभव काही वेगळाच असतो. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे पुस्तकांचे जतन आणि संवर्धन होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत,'' असे मत बुकगंगा इंटरनॅशनलचे संचालक मंदार जोगळेकर यांनी व्यक्त केले.

व्ही. जी. जोशी जनरल ट्रस्टच्या वतीने 'वासुकाका जोशी पारितोषिक' वितरण सोहळा जोगळेकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी झाला. या वेळी पुणे विद्यार्थी गृहामधील मुद्रण तंत्रज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या १७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. कार्यक्रमात मुद्रण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कांत दाभोळकर यांना गौरविण्यात आले. या वेळी ट्रस्टचे विश्वस्त श्रीकांत जोशी, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष रामचंद्र शेटे, संचालक राजेंद्र कडुसकर, सुनील रेडेकर उपस्थित होते.

जोगळेकर म्हणाले, ''बदलते तंत्रज्ञान विचारात घेऊन त्याप्रमाणे आपल्या व्यवसायात बदल करणे आवश्यक आहे. तसेच नवनवे तंत्रज्ञान येत असले तरीही छापील पुस्तकाचे महत्त्व काही कमी होणार नाही; परंतु तंत्रज्ञानाच्या मदतीने साहित्याचा ठेवा जतन करणे सहज शक्य आहे.''

दाभोळकर म्हणाले, ''डिजिटल मुद्रण व्यवसायात नवनवे बदल होत आहेत. आता आपण ऑनलाइन मुद्रणाकडे प्रवास करत आहोत. 'ई-बुक'पेक्षा छापील पुस्तके खरेदी करण्याला तरुण पिढी अधिक प्राधान्य देत असल्याचे अमेरिकेतील विद्यापीठात नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. त्यामुळे तरुणांनी मुद्रण क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहावे आणि बदलत्या तंत्रज्ञानानुसार या क्षेत्रात नव्याने येणारी आव्हाने पेलण्यासाठी सज्ज झाले पाहिजे.''

प्रास्ताविक रामचंद्र शेटे यांनी, तर सूत्रसंचालन नेहा कुलकर्णी यांनी केले.



**सहकारनगर : 'वासुकाका जोशी स्मृती शिष्यवृती' विद्यार्थ्यांना सुपूर्त करताना मंदार जोगळेकर.**